शासनसेवेत पुन:स्थापित करून पदस्थापना देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**क्रमांक:- R& FD-15071/14/2026- MRF(DESK E9)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०९ एप्रिल, २०२६

वाचा:- १. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश जा.क्र.२०२५/मशाका-१/आस्था (चौ)/प्र.क्र.२७, दि.०४.०८.२०२५
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक निप्रआ-११२२/ प्र.क्र.०९/विचौ-२, दि.२२.०४.२०२५

**शासन आदेश-**

श्री.संभाजी सदाशिव थोटे, तत्का.नायब तहसिलदार (निवडणूक), जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर, जि.छत्रपती संभाजीनगर हे अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय पैठण-फुलंब्री या पदावर कार्यरत असताना मौजे फुलंब्री येथील ग.न.१७ मध्ये अकृषिक परवानगीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून अंतिम आदेश निर्गमीत होईपर्यत संचिका श्री.थोटे यांच्या ताब्यात असल्याने फिर्यादी श्रीम.पार्थीकर यांनी श्री.थोटे यांच्याविरुध्द उक्त जमिन विषयक बाबीच्या अनुषंगाने दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे फुलंब्री येथे त्यांचेविरुध्द भा.द.वि.कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७३, १२० (ब), ४०९, १६७, १३४ अन्वये गु.र.क्र.१९४/२०२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यामध्ये श्री.थोटे यांचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना दि.२५.०७.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. त्यांचा पोलीस अभिरक्षेतील कालावधी ४८ तासांपेक्षा अधिक असल्याने व त्यांनी वरील प्रमाणे गंभीर स्वरुपाचे गैरकृत्य करुन शासकीय कामकाजात नितांत सचोटी व कर्तव्यपरायणता राखली नाही व जनमानसात शासनाची प्रतिमा मलीन केल्याने संदर्भीय आदेश क्र.१ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ (२) मधील तरतुदीनुसार श्री.थोटे यांना दि.२५.०७.२०२५ पासून शासन सेवेतून मानीव निलंबित करण्यात आले आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांनुसार श्री.संभाजी सदाशिव थोटे, तत्का.नायब तहसिलदार (निवडणूक), जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर, जि.छत्रपती संभाजीनगर यांच्या निलंबनाचा कालावधी सुमारे ८ महिन्यांपेक्षा जास्त झालेला असल्याने त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने श्री.थोटे यांच्या निलंबन प्रकरणाचा आढावा घेण्यात आला असून, श्री.थोटे यांना अकार्यकारी पदावर शासनसेवेत पुन:स्थापित करण्याची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ (५) (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री.संभाजी सदाशिव थोटे, तत्का.नायब तहसिलदार (निवडणूक), जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर, जि.छत्रपती

संभाजीनगर यांचे निलंबन संपुष्टात आणून त्यांना, त्यांच्याविरुध्दच्या विभागीय चौकशीच्या निर्णयाच्या अधिन राहून अकार्यकारी पदावर शासनसेवेत पुन:स्थापित करण्यात येत आहे.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांनुसार श्री.संभाजी सदाशिव थोटे, तत्का.नायब तहसिलदार (निवडणूक), जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना त्यांचा मूळ जिल्हा व ज्या जिल्ह्यात कार्यरत असताना निलंबित केले तो जिल्हा वगळून **नायब तहसीलदार (संगांयो शहर), तहसिल कार्यालय बीड, जि.बीड** या पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.

४. श्री.संभाजी थोटे यांनी तात्काळ सदर पदावर रूजू व्हावे. संबंधित अधिकारी नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी deske9-rfd@mah.gov.in या ई-मेलद्वारे/टपालाद्वारे शासनास त्वरित कळवावे.

५. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयत्तेर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या उक्त तरतुदीनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापुर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध **शिस्तभंगविषयक कारवाई** करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास, त्यांच्या **अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन** (dies non) **म्हणून गणला जाईल**, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने सदर अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते सदर अधिकाऱ्याच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

८. उपरोक्त आदेश सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत असल्याने पदस्थापनेच्या ठिकाणी परिविक्षाधीन तहसीलदार वा अन्य अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन तात्पुरते व्यवस्थेने पदस्थापना दिलेली असल्यास अशा अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांनी अन्य रिक्त पदावर पदस्थापना द्यावी.

९. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून पदस्थापना रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ही गैरवर्तणूक समजून त्यांचे विरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०४०९१५२९२३६११९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIKANT MADHUKAR MOHITE

Digitally signed by SHRIKANT MADHUKAR MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=5B514D2C3257BBA976C5A2DE42BE8A635BBA691C05D1F65ED0EAD155A190E90E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5F152866E6FC64E39CF88B9CB27AE0169A65B000039B269233C42B5B77F06B31, cn=SHRIKANT MADHUKAR MOHITE
Date: 2026.04.09 17:09:30 +05'30'

**(श्रीकांत म. मोहिते)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

श्री.संभाजी सदाशिव थोटे, तत्का.नायब तहसिलदार (निवडणूक), जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर, जि.छत्रपती संभाजीनगर (विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत)

प्रत:-

१) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
२) जिल्हाधिकारी, बीड/छत्रपती संभाजीनगर.
३) निवड नस्ती, आस्था- ९ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.